2017-18

28/2018

The Berar General Education Society's

# SITABAI ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, AKOLA

*(NAAC Reaccredited "A" grade)*


University Grants Commission, Sponsored
One Day National Conference
*On 30 January 2018*

# Economical Study of Regional Disparity in India

Special Issue of an International

**SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES**

IMPACT FACTOR SJIF (2016)-6.177
ISSN : 2[illegible]-4766 (P). ISSN : 2278-8808 (E)



330

**Editor**

**Dr. Prasannajit R. Gawai**

VOL-2

Scanned with CamScanner

# INDEX



| Sr. No | Title of Article & Author (S) Name | Page No. |
|---|---|---|
| 64 | सिंचनाच्या असमतोलचा मराठवाडयाच्या कृषी उत्पादकतेवर झालेल्या परिणामाचा अभ्यास<br>*डॉ. के.के.पाटील & सौ. पाटील चारुशिला विलयराव* | 246-249 |
| 65 | महाराष्ट्रातील प्रादेशिक असतोल : विशेष संदर्भ विदर्भ<br>*डॉ. प्रसन्नजीत आर. गवई* | 250-252 |
| 66 | प्रादेशिक असमतोल — विदर्भ एक दृष्टिक्षेप<br>*डॉ. संतोष तु. कुटे* | 253-254 |
| 67 | भारता मधील प्रादेशिक असमतोल<br>*प्रा. सुरेश भालतिडक & प्रा. डॉ.सुभाष गुर्जर* | 255-258 |
| 68 | प्रादेशिक असमतोल विकासमार्गातील अडथळा<br>*डॉ. नितीन ज्ञा. चौधरी* | 259-262 |
| 69 | विदर्भातील शैक्षणिक असमतोल<br>*प्रा.डॉ. प्रभाकर उत्तमराव आठवले* | 263-265 |
| 70 | भारतातील मानव विकास निर्देशांकातील राज्यनिहाय असमतोल<br>*प्रा. डॉ. दिनकर उंबरकर* | 266-268 |
| 71 | महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलासंबंधी दांडेकर आणि केळकर समितीच्या शिफारशींचे विश्लेषणात्मक अध्ययन<br>*प्रा.डॉ. दयाळू किसन राठोड* | 269-272 |
| 72 | महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल<br>*प्रा. डॉ. सुरेश दगडु पाटील* | 273-277 |
| 73 | भारतीय अर्थव्यवस्थेवर प्रादेशिक विषमतेचा परिणाम<br>*प्रा. एम. पी. चोपडे* | 278-281 |
| 74 | महाराष्ट्रातील औद्योगिक क्षेत्रातील असमतोल एक अभ्यास<br>*प्रा. डॉ. निलम एम. छंगाणी* | 282-284 |
| 75 | मराठवाडा विभागातील औद्योगिक विषमता<br>*डॉ. मुंडकर संजय मारोतीराव* | 285-287 |
| 76 | महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल<br>*प्रा. प्रिया राजेंद्र दामोदर* | 288-289 |
| 77 | महाराष्ट्रातील उद्योगांचे केंद्रीकरण आणि प्रादेशिक आर्थिक विकास<br>*प्रा. डॉ. खोराजके के. एस.* | 290-294 |
| 78 | महाराष्ट्राचा कृषीविषक प्रादेशिक असमतोल<br>*प्रा. डॉ. मधुकर एस. ताकतोडे* | 295-297 |
| 79 | भारतातील प्रादेशिकतावाद आणि विकासाचे प्रश्न<br>*डॉ. हरिहर शिवदास मोहोकार & डॉ. नंदकिशोर नानासाहेब उगले* | 298-300 |
| 80 | स्वतंत्र विदर्भाची गरज आणि अर्थव्यवस्था<br>*डॉ. प्रा.नीता तिवारी* | 301-304 |




Smt. Sindhutai Jadhav Maha... 330

Scanned with CamScanner

९०/७-१०



66.

# प्रादेशिक असमतोल – विदर्भ एक दृष्टिक्षेप

**डॉ. संतोष तु. कुटे**

*सहयोगी प्राध्यापक तथा विभाग प्रमुख,अर्थशास्त्र, श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय, मेहकर*

**प्रस्तावना:** डॉ. विजय केळकर समितीचा अहवाल विधिमंडळात मांडण्याचे टाळल जात होत . हा अहवाल अखेर विधिमंडळात मांडण्यात आला . त्यामुळे प्रादेशिक विकासाचा असमतोल पुन्हा चर्चेत आला आहे. वैधानिक विकास महामंडहाची नियुक्ती होवुनही असमतोल कमी झालेला नाही. या प्रश्नांवर घ्यायचे निर्णय आणि त्या संदर्भातील आव्हाने यांचा हा वेध घेणे. राज्यात विकासाचा असमतोल आहे. यात कोणाचही दुमत असण्याच कारण नाही. विकासाच्या मुद्द्यावरून राजकारण होत. विकासाचा असमतोलच नवी राज्य निर्माण करण्याला कारणीभूत ठरत असतो. विकासाचा असमतोल किती आहे. हे तपासण्यासाठी राज्य सरकारनं अर्थतज्ञ डॉ. वि.म. दांडेकर यांची समिती नेमली होती. या समितीत १६ सद्स्य होते. य समितीनं १९८४ मध्ये अहवाल सादर केला त्यात महाराष्ट्राच्या विकासाचा अनुशेष किती रूपयांचा आहे तो कोणत्या विभागात आहे. याचा उल्लेख केला होता. १९८४ मध्ये तीन हजार १८६ कोटी रूपयांचा अनुशेष होता. त्यात सिंचनाचा १३८५ कोटी रूपयांचा अनुशेष होता. त्या खालोखाल रस्ते ६०० कोटी , पाणीपुरवठा ३७८ कोटी, ग्रामीण विद्युतीकरण २४० कोटी, आरोग्य सेवा २२१ कोटी २१ लाख, भूविकास आणि मृदसंधारण १७७ कोटी ७७ लाख शिक्षण ९१ कोटी ५५ लाख, तंत्रशिक्षण ८३ कोटी ४० लाख, पशुवैद्यक विभाग सात कोटी ७५ लाख असा अनुशेष होता त्यातही विदर्भाचा अनुशेष १२४६ कोटींचा, मराठवाडयाचा ७५० कोटी ८५ लाखांचा, पश्चिम महाराष्ट्राचा ८८४ कोटींचा, कोकणाचा २९५ कोटींचा तर मुंबईचा नऊ कोटी ७९ लाखांचा होता. ही आकडेवारी पाहिली ,तर विदर्भात मोठा अनुशेष होता, हे मान्य करावं लागेल. विदर्भ, मराठवाडयापेक्षा पश्चिममहाराष्ट्राच्या विकासाचा अनुशेष जास्त आहे.

**सिंचनाचा अनुशेष:** डॉ. दांडेकर समितीच्या अहवालानंतर त्यावर आणखी खोलात जाऊन अभ्यास करून अनुशेष दूर करण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन केली होती १९८७ मध्ये उच्चस्तरीय समितीने त्याबाबतचा अहवाल दिलाय परंतु सरकारनं त्यावर काहीच कार्यवाही केली नाही. सरकारन कालबद्ध पद्धतीने विभागनिहाय अनुशेष दुर करण्याचा निर्णय मात्र घेतला. त्यासाठी अंदाजपत्रकात जादा तरतूद करण्याच ठरवल. त्यानंतर राज्य सरकारनं वैधानिक विकास महामंडळाची स्थपना करण्याचा निर्णय घेतला. राज्यपालांना या महामंडळाचे घटनात्मक प्रमुख केल. राज्यपालांचं अर्थसंकल्पावर थेट नियंत्रण आलं . शरद पवार यांनी वैधानिक विकास महामंडळाची स्थापना करण्याचा निर्णय घेतला, तेव्हा शंकरराव चव्हान यांनी त्यांना विरोध केला होता. सरकारच्या अधिकारावर मर्यादा येतील, अस चव्हान यांनी सूचित केल होत. त्याचा प्रत्यय नंतर आला, तरीही अनुशेषाचा प्रश्न सुटला नाही, उलट वाढत गेला. राज्यात हजारो कोटी रूपये खर्च करूनही विदर्भ, मराठवाडयाचा सिंचन अनुशेष वाढत गेला. कृष्णा खोऱ्याचं पाणी ठराविक काळात अडवण्याची अट होती. त्यामुळे युतीच्या सरकारसह नंतर आलेल्या सरकारांनीही पश्चिम महाराष्ट्रातील सिंचन प्रकल्पांवर खर्च करण्याला प्राधान्य दिलं. त्यामळे विदर्भातील महत्वाच्या गोसीखुर्द प्रकल्पासह अन्य प्रकल्पाची काम रेंगाळली. भोकडा कोटींच्या प्रकल्पांचा खर्च हजारो कोटींवर गेला. अनुशेष मुख्यत: नऊ निकषांवर काढण्यात आला होता. त्यात मुख्यत: पाटबंधारे, रस्ते, शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, तंत्रशिक्षण, नागरी पाणीपुरवठा, मृदसंधारण पशुवैद्यकीय सेवा, कृषी पंप आदींचा समावेश होता. वैधानिक विकास महामंडळ नेमून आणि अनुशेष कालबद्ध कार्यक्रमाद्वारे दूर करण्यांच जाहीर करूनही जेव्हा १९९४ अखेरचा आढावा घेतला, तेव्हा अनुशेषाची रक्कम पाच पटींनी वाढली होती. त्यातील आकडेवारी पाहीली तर पश्चिम महाराष्ट्राचा पूर्वीचा अनुशेष वाढला असला तरी मराठवाडयापेक्षा तो कमी आहे. विदर्भ अनुशेषाच्या बाबतीत पहिल्या क्रमांकावर, मराठवाडा दुसऱ्या क्रमांकावर, तिसऱ्या क्रमांकावर उर्वरित महाराष्ट्र आहे. विदर्भाचा अनुशेष सहा हजार ६२४ कोटी दोन लाख रूपये, मराठवाडयाचा चार हजार चार कोटी ५५ लाख रूपय तर उर्वरित महाराष्ट्राचा अनुशेष तीन हजार ३७८ कोटी वीस लाख रूपये आहे. रस्त्याच्या बाबतीत पश्चिम महाराष्ट्राचा अनुशेष मराठवाडयापेक्षा जास्त आहे. पशुवैद्यकीय सेवा, मृदसंधारण,



330

नागरी पाणीपुरवठा, सार्वजनिक आरोग्य, तंत्र शिक्षण आदी बाबतीत पश्चिम महाराष्ट्र हा विदर्भापेक्षा मागासलेला असं सांगितलं तर आश्चर्य वाटेल, परंतु ती वस्तुस्थिती आहे. पाटबंधाऱ्याचा विदर्भाचा अनुशेष चार हजार कोटी, मराठवाड्याचा दोन हजार चारशे कोटीचा होता. याचाच अर्थ सिंचनाच्या बाबतीत मराठवाडा, विदर्भाकडं पूर्णत: दुर्लक्ष करण्यात आलं. पश्चिम महाराष्ट्रापेक्षा मराठवाड्यातील अनेक तालुक्यांचा पावसाची सरासरी जास्त असली तरी जलसंधारणाच्या पुरेशा योजना नसल्यानं तसंच शास्वत पाण्याची व्यवस्था नसल्यानं एखादया वर्षी पाऊस कमी पडला, तर दुष्काळाला समोर जाण्याची वेळ येते. त्यातच विदर्भ, मराठवाड्यात कपाशीच पीक जास्त घेतलं जातं भाव कमी मिळाला, दुष्काळामुळं पीक हातचं गेलं तर शेतकरी आत्महत्या करतात. विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचं लोण पश्चिम महाराष्ट्र तसेच खानदेशातील शेतकऱ्यांपर्यंत पोचलं आहे. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या मराठवाडा, विदर्भाच्या तुलनेत कमी आहे,

**असमतोल विकास:** राज्य सरकारने १९८४ आणि १९९४ च्या अनुशेषाची आकडेवारी काढली होती १९८४ मध्ये तीन हजार १८६ कोटी रूपेय असलेला अनुशेष १९९४ मध्ये १४ हजार सहा कोटींवर गेला होता. आत्महत्येच लोण त्यानंतर वाढलं हे लक्षात घेतलं असता आता अनुशेषाचा आकडा किती वाढला असेल, हे लक्षात येतं दहा वर्षांमध्ये अनुशेषाचा आकडा पाचपट झाला होता. वीस वर्षांमध्ये तोटीड लाख कोटींवर गेला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. राज्याच्या अर्थसंकल्पाच्या तिप्पट अनुशेष असेल तर तो दूर करण्यासाठी किती प्रयत्न करावे लागतील, याची कल्पनाच न केलेली बरी. राज्याच्या एकूण अर्थसंकल्पाच्या तिप्पट अनु शे झाला असावा. राज्याच्या असमतोल विकासाचं हे चित्र विधिमंडळात वारंवार मांडलं गेलं. त्यामुळेच अर्थतज्ञ डॉ. विजय केळकर यांची समिती नेमण्यात आली होती. २०११ मध्ये नेमलेल्या या समितीनं दीड वर्षापूर्वी अहवाल सादर केला. पृथ्वीराज चव्हान यांनी या समितीची स्थापना केली होती. १४ जणांच्या या समितीनं अहवाल दिल्यानंतरही राज्य सरकारनं तो मांडण्याची चालढकलकेली होती. तालुका हा घटक मानून विकासाचा अनुशेष काढण्याचं सूत्र या समितीनं ठरवलं होतं. त्यामुळे या समितीचा अहवाल जाहीर होण्याअगोदर विदर्भातुन त्याला विरोध झाला होता . डॉ. केळकर समीतीच्या शिफारसीत १ ते ३१ डीसेंबर या काळात मंत्रालय नागपूरला हलवणे, औरंगाबाद आणि अमरावती विभागातील सिंचनातील तूट दूर करण्याच्या सूचना यात करण्यात आल्या आहेत. विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्राच्या स्थुल उत्पन्नातील फरक मागील पाच वर्षात वाढतच गेला. दोन प्रदेशांमधील ही तफावत पाचपट झाल्याचे स्पष्ट झाले आहे. विदर्भापेक्षा उर्वरित महाराष्ट्राचा जीडीपी तब्बल पाचपट जास्त असल्याची आकडे मांडण्यात आले आहेत. विदर्भाच्या विकासाबाबत सातत्याने प्रयत्न होत असतानाही जीडीपीतील ही तफावत वाढत गेल्याचे दिसून आले आहे. आर. एस. रूईर इन्स्टिटयुट ऑफ लेबर अँण्ड सो ल–कल्चर स्टडीज या संस्थेने आपल्या अभ्यासातून ही तफावत लक्षात आणून दिली आहे. महाराष्ट्रात सरकारच्या २०१६–१७ आर्थिक सर्वेक्षणाचा आधार घेऊन संस्थेने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यांच्या प्रगतीचा आलेख मांडला आहे. या आकड्यांनी विदर्भ आणि मराठवाड्याचे स्थूल उत्पन्न यांच्यातील प्रचंड तफावत सिध्द केली आहे. २०११–१२ ते २०१५–१६ या काळात प्रादेशिक विकासातील ही पाच पट झाली आहे. विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्राच्या जीडीपीमधील तफावत २०११–१२ मध्ये ६ लाख ६९ हजार २९८ कोटी रूपयांची होती तर हीच तफावत २०१५–१६ मध्ये ८ लाख ३९ हजार ३८५ कोटी रूपये इतकी झाली होती केवळ पाच वर्षांच्या कालावधीत विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्राच्या जीडीपीतमधील तफावत २५ टक्क्यांनी वाढावी, हे चीतांजनक असल्याचे या अभ्यासात मांडण्यात आले आहे. केळकर समितीने २०१० पर्यंतचे आकडे आधारभूत ठेवून अभ्यास केला होता. केळकर समितीच्या स्थापनेनंतरही विदर्भ विकासाचे फारसे उत्साहवर्धक काहीही घडले नाही. २०११–१२ मध्ये विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्र यांच्या जीडीपीतील तफावत चारपट होती. २०१५–१६ पर्यंत उर्वरित महाराष्ट्राच्या जीडीपीत लक्षात येण्याजोगी लक्षात येण्याजोगी वाढझाली तर विदर्भाचा जीडीपी मात्र तसाच रेंगाळत राहिला. त्यामुळे, चार पटींवरून जीडीपीतील तफावत पाच पटींवर गेली आहे. सर्व प्रयत्नांनंतरही ही प्रादेशिक विषमता वाढतच गेली असल्याचे दीसुन येते.

**संदर्भ ग्रथ सुची**

*दास्ताने संतोष 'महाराष्ट्र' दास्ताने रामचंद्र आणि कं. पुणे.*
*देशमुख बी.टी. महाराष्ट्रातील जलसिंचन अनुशेष श्र–किरण प्रकाशन, पिंपळापुरे पब्लिकेशन, पुणे.*
*महाराष्ट्राची आर्थिक पहाणी , महाराष्ट्र शासन २०१५–१६*
*वृत्तपत्र*
*महाराष्ट्र टाईम्स*
*लोकसत्तावार्ता*

330 Smt. Sindhutai Jadhao College Mehkar

Coordinator - IQAC
Smt.Sindhutai Jadhao College
Mehkar.Dist.Buldana



Scanned with CamScanner